Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# भारताच्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे : एक अभ्यास

**जाधव विश्वजीत हणमंतराव**
एम.ए. राज्यशास्त्र, बी.एड्., सेट
संशोधक

**डॉ. पी. डी. सुर्यवंशी**
मार्गदर्शक
प्राध्यापक, राज्यशास्त्र विभागप्रमुख
स्वा.सै. सूर्यभानजी पवार महाविद्यालय
पुर्णा जि. परभणी

**प्रस्तावना**

आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय राजकारणात अनेक बदल झालेले आहेत. या बदलाचा भारतीय परराष्ट्र धोरणावर प्रभाव पडलेला आहे. त्यामुळे भारताने देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा विचार करून परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये निर्धारित केली होती. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीपासून ते आजपर्यंत भारतीय परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टांमध्ये सातत्याने बदल झाले आहेत. भारतीय परराष्ट्र धोरणाचे प्राथमिक उद्दिष्ट्ये, मध्यवर्ती उद्दिष्ट्ये व आंतरराष्ट्रीय उद्दिष्ट्ये असे विभाजन केले आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टाचे तीन भागावत विभागणी केली आहे. पहिल्या भागातील प्रराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे हे ताठर स्वरूपाचे असू शकतात यामध्ये शासन सहसा बदल करू शकत नाही. तर मध्यवृत्ती परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे हे शासनाच्या सोयिप्रमाणे असतात. यामध्ये शासन आवश्यक त्या प्रमाणात बदल करू शकते. तर आंतरराष्ट्रीय पातळीवरील पराष्ट्र धोरणाचे उद्दिष्टे हे वेळप्रसंगी बदलणारे असू शकतात.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. भारताच्या पराष्ट्र धोरणाच्या प्राथमिक उद्दिष्टांचा अभ्यास करणे.

२. भारताच्या पराष्ट्र धोरणाच्या मध्यवर्ती उद्दिष्टांचा अभ्यास करणे.

३. भारताच्या पराष्ट्र धोरणाच्या आंतरराष्ट्रीय उद्दिष्टांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनाच्या विविध पद्धती आहेत. यामध्ये ऐतिहासिक, विश्लेषणात्मक सांख्यिकीय इत्यादी संशोधन पद्धती आहेत. प्रस्तुत अभ्यासाचा विषय भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टांचा

अभ्यास असा असल्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**प्राथमिक उद्दिष्टे**

प्राथमिक उद्दिष्टे हे देशाशी संबंधित असून यामध्ये कसल्याही प्रकारची लवचिकता किंवा तडजोड नसते. अत्यंत महत्त्वपूर्ण आणि अनिवार्य अशा मूलगामी स्वरूपाच्या उद्दिष्टांचा समावेश प्राथमिक उद्दिष्टांत केला जातो. प्राथमिक उद्दिष्टांचा आढावा खालील प्रमाणे घेतला आहे.

**१. भारताच्या राष्ट्रीय हिताचे रक्षण व संवर्धन करणे**

राष्ट्रीय हिताच्या पहिले उद्दिष्टे हे राष्ट्रीय हिताचे रक्षण किंवा संवर्धन करण्याशी संबंधित आहे. यामध्ये देशाचे सार्वभौम, स्वातंत्र्य, राष्ट्रीय एकात्मता व अखंडतेचे जतन व संवर्धन करणे महत्त्वाचे होते. यानुसार देशातील प्रत्येकांचा स्वाभिमान, आत्मविश्वास, आत्मनिर्भरता, संरक्षण, कल्याण, समृद्धी या भावनांची जोपासना करणे महत्त्वाचे असते. या तत्वानुसार भारताने अलिप्ततावाद, पंचशील, आर्थिक व व्यापारी हितसंबंधांचे रक्षण करणे, काश्मीर प्रश्न, गोवामुक्ती आंदोलन, बांग्लादेश स्वतंत्र, हिंद महासागर, दहशतवाद, पर्यावरण, संरक्षण, आंतरराष्ट्रीय सौर आघाडी, मानवाधिकार, सागरी सुरक्षा, अनिवासी भारतीयांचा सन्मान अशा विविध प्रसंगी भारताचे राष्ट्रीय हिताचे रक्षण व संवर्धनाची भूमिका आंतरराष्ट्रीय, विभागीय, प्रादेशिक संघटनांसमोर मांडली आहे. भारताने आपल्या देश व विदेशातील नागरिकांच्या हिताचे रक्षण करणे, देशाच्या संपत्तीचे संवर्धन करणे, भारतीय सांस्कृतिक मूल्यांचे, प्रतिष्ठेचे, ऐतिहासिक वारशाचे रक्षण करण्याचा प्रयत्न सातत्याने केला आहे. या उद्दिष्टानुसार भारताने राष्ट्रीय हितसंबंधाचे जतन व संवर्धन काटेखोरपणे केले आहे.

**२. राष्ट्राचे संरक्षण करणे**

या उद्दिष्टानुसार दुसऱ्या राष्ट्राच्या आक्रमण व युद्धापासून देशाचे संरक्षण करण्याबरोबर आंतरराष्ट्रीय सीमाचेही संरक्षण करावे लागते. राष्ट्राचे संरक्षण करणे हे राष्ट्रीय हिताचे प्राथमिक उद्दिष्ट्य आहे. देशाची भूमी व नागरिक संरक्षण करण्याची जबाबदारी परराष्ट्र धोरणाला करावी लागते. यासाठी परराष्ट्र धोरणाला सातत्याने सर्तक राहिले पाहिजे. जे राज्य केवळ आपल्या भूमीचे संरक्षण करण्याचे धोरण ठरविते त्या धोरणास 'यथास्थितीचे धोरण' असे म्हणतात. परंतु दुसऱ्या राज्याचे प्रदेश किंवा कोणाचाही हक्क नसलेले प्रदेश हस्तगत करण्याचे धोरण ठरविते त्या राज्यास सुधारणावादी धोरण असे म्हणतात. लष्करी शक्तीचा उपयोग, प्रत्यक्ष

बोलणी करून अशा प्रकारचे धोरण आखले जाते. या उद्दिष्टाचे योग्य उदारण महणजे १९७१ मध्ये भारत व रशियामध्ये २० वर्षांसाठीचा शांततापूर्ण झालेला मैत्री संरक्षण करार होय. याच दृष्टिकोनातून १९७४ मध्ये पहिली आण्विक चाचणी, १९९८ मध्ये दुसरी आण्विक चाचणी, भारत-फ्रान्स राफेल करार, भारत- अमेरिका नागरी अणूऊर्जा करार भारत-इस्त्राईल संरक्षण करार, रशियासोबतचा एस-४०० अँटीब्लास्टीक क्षेपणास्त्र करार, अरिहंत आण्विक पाणबुडी, सागरी सुरक्षा, ऊर्जा सुरक्षा, सायबर सुरक्षा, संरक्षण क्षेत्रात अत्याधुनिक व प्रगत तंत्रज्ञानाचा वापर, लष्करी संख्येत वाढ, लष्करी कवायती करणे, लष्कराचे आधुनिकीकरण, विज्ञान व तंत्रज्ञानाची प्रगती, अंतराळ क्षेत्रातील प्रगती अशा विविध दृष्टिकोनातून राष्ट्राचे संरक्षण करण्यावर भर दिला जातो.

**३. राष्ट्रीय संपत्तीचे रक्षण व जतन करणे**

भारताचा सामाजिक व आर्थिक विकास हा देशांतर्गत असणाऱ्या नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबून असतो. नैसर्गिक साधनसंपत्तीमध्ये खनिज पदार्थामध्ये पेट्रोल-डिझेल, कोळसा, सोने-चांदी इत्यादी खाणी तसेच गॅस, पाणी, जमीन, पर्यावरण संरक्षण, ऊर्जा, नदी अशा विविध नैसर्गिक साधनसंपत्तीचे संरक्षण व संवर्धन भारताकडून केले जाते. कृषी उत्पादन, खनिज उत्पादन, वनस्पती व जलसंपत्तीचे संरक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. कोणत्याही देशाचा औद्योगिक विकास हा त्या देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबून असतो. त्यामुळे दुसऱ्या राष्ट्राच्या आक्रमण व हस्तक्षेपापासून भारताला राष्ट्रीय संपत्तीचे जतन व संवर्धन करावे लागते.

**४. राष्ट्राचा आर्थिक विकास करणे**

देशाचा आर्थिक विकास घडवून आणणे हे देशाचे प्राथमिक उद्दिष्ट्य आहे. प्रत्येक राष्ट्र स्वत: सर्वच बाबतीमध्ये कधीच स्वालंबी नसते. त्यासाठी त्यांना इतर राष्ट्रावरसुद्धा अवलंबून राहवे लागते. याच दृष्टिकोनातून भारताला विकासासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी परराष्ट्र धोरणातून सुद्धा पूर्ण केल्या जातात. यामध्ये परकीय राष्ट्राकडून भांडवल गुंतवणूक, तंत्रज्ञान, यंत्रसामुग्री, कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळ, कच्चा माल, ऊर्जा, इंधन, आयात-निर्यात वस्तू इत्यादींची आवश्यकता आर्थिक विकासासाठी असते. यासाठी भारताने शेजारील व इतर अनेक राष्ट्रांशी राजकीय, आर्थिक, व्यापारी, सामाजिक व सांस्कृतिक संबंधातून विकास साध्य करण्यावर भर दिला जातो. १९४७ ते १९९० या काळात सोव्हिएत रशियाने भारताच्या आर्थिक विकासासाठी मदत केली. शीतयुद्ध समाप्तीनंतर जागतिकीकरणाचा स्वीकार, मुक्त अर्थव्यवस्था, परकीय गुंतवणुकीला

प्राधान्य, बहुराष्ट्रीय कंपन्यांना परवानगी, लुक ईस्ट धोरण, अमेरिका व युरोपियन प्रगत देशांशी संबंध वाढविण्याचा हेतू हा आर्थिक विकासाचाच एक भाग आहे. भारताने आतापर्यंत केलेली आर्थिक प्रगती ही सेवाक्षेत्रावर आधारित विशेषतः माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे फलित आहे. पण आता भारताने 'मेक इन इंडिया' च्या माध्यमातून औद्योगिक क्षेत्राच्या विकासावर आधारित अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यासाठी लुक ईस्ट ते ॲक्ट ईस्ट परकीय गुंतवणूक आकर्षित करणे, नेबहरहुड फर्स्ट, परकीय भांडवल, तंत्रज्ञान, ऊर्जा सुरक्षा, डिजिटलायझेशन, औद्योगिक उत्पादनात वाढ, पायाभूत सुविधाचा विकास, आण्विक पुरवठादार गटात सहभाग, आंतरराष्ट्रीय व विभागीय संघटनाशी आर्थिक सहकार्य करण्यावर भर दिला जात आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता परकीय गुंतवणूक आकर्षित करून भारतात रोजगारांची संधी उपलब्ध करून देऊन आर्थिक समानता राखणे हा भारतीय परराष्ट्र धोरणाचे खास उद्दिष्टे असलेले दिसून येते.

**५. राष्ट्रीय शक्तीत वाढ करणे**

आंतरराष्ट्रीय पातळीवर ज्या राष्ट्राची अर्थव्यवस्था सामर्थशाली आहे अशाच राष्ट्राचा परराष्ट्र धोरणावर प्रभाव पडत असतो. त्यामुळे प्रत्येक राष्ट्राला आपल्या शक्तीत वाढ करणे गरजेचे असते. राष्ट्रशक्ती सामर्थशाली नसल्यास धोरण अयशस्वी होऊ शकते व त्याचा राष्ट्रावर विपरित परिणाम होण्याची शक्यता असते. यामुळे राष्ट्र कमकुवत व अस्थिर बनू शकते. त्यासाठी सैन्य संख्येत वाढ, लष्कराचे आधुनिकीकरण, शस्त्रास्त्राची निर्मिती क्षेपणास्त्राची निर्मिती, लष्करी कवायतीत वाढ, विविध देशांशी लष्करी व संरक्षण करार करणे, संरक्षणव्यवस्था मजबूत करणे, विज्ञान व तंत्रज्ञानात प्रगती, अंतराळ क्षेत्रात प्रगती, कृषी उत्पादनात वाढ, माहिती तंत्रज्ञानाचा विकास अशा विविध क्षेत्रात प्रगती व विकास केल्याने राष्ट्रीय शक्तीत वाढ होते. याच बाबींचा विचार करून भारताने परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून राष्ट्रीय शक्ती वाढविण्यावर भर दिला आहे. याचे खास उदा म्हणजे स्वतंत्र बांग्लादेशाची निर्मिती, आण्विक चाचणी घेणे, चंद्रयान व मंगळयान प्रक्षेपण, विविध आंतरराष्ट्रीय संघटनेत भारताचा सहभाग आदी पैलुमुळे राष्ट्रीय शक्तीत वाढ होत असते.

**मध्यवर्ती उद्दिष्टे**

**१. राष्ट्र प्रतिष्ठा मिळविणे**

आंतरराष्ट्रीय पातळीर एखाद्या राष्ट्राची पत उंची असेल तर त्यांचा परिणाम परराष्ट्र धोरणावर होत असतो. त्यासाठी काही राष्ट्र जागतिक प्रतिष्ठा मिळविण्यासाठी प्रचार व प्रसार साधनांचा भरपूर उपयोग करतात.

आज भारताने अनेक क्षेत्रात चौफेर चांगली प्रगती करत असल्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या प्रतिष्ठा व मान-सन्मानात वाढ झाली आहे. भारताने माहिती तंत्रज्ञान, अंतराळ, आर्थिक विकास, संरक्षण व्यवस्था, कृषी क्षेत्रातील विविध क्रांती, सांस्कृतिक विकास, पर्यावरण संरक्षण, दहशतवादाविरुद्ध जनमत संघटित, मित्र संख्येत वाढ, युद्धात अडकलेल्या भारतीयांची सुटका, नैसर्गिक आपत्तीत इतर राष्ट्रांना मदत, छोट्या देशांना आर्थिक मदत इत्यादी कार्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची प्रतिष्ठा वाढलेली दिसून येते. याच बरोबर दुसऱ्या राष्ट्रांचे पंतप्रधान किंवा राष्ट्रपती त्यांचा सन्मान करण्यासाठी सैनिकी संचालन किंवा कवायतीची सलामी, ऐतिहासिक वारसा व संस्कृतीचे प्रदर्शन करून प्रतिष्ठा राखण्यावर भर दिला जातो.

**२. शेजारी राष्ट्रांसोबत मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करणे**

भारताचे परराष्ट्र धोरण हे शेजारील राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचे राहिले आहे. कारण भारताचा विकास हा शेजारी राष्ट्रांमधील शांतता बरोबरच लोकशाहीचे अस्तित्व, राजकीय स्थैर्य व त्यांच्या आर्थिक विकासासी निगडित आहे. म्हणजेच भारताच्या शेजारील राष्ट्रामध्ये शांततापूर्ण मार्गाने लोकशाही प्रस्थापित झाली तर भारतीय उपखंडात शांतता व आर्थिक स्थैर्य निर्माण होईल. सध्या भारताने शेजारील राष्ट्राशी मैत्री व सहकार्याचे संबंध निर्माण करण्यासाठी 'नेबरहुड फर्स्ट' हे धोरण राबविले आहे. याशिवाय भारताने सार्क संघटनेतील श्रीलंका, मालदीव, अफगाणिस्तान, भुतान, नेपाळ, बांग्लादेश आणि पाकिस्तान यांच्याशी मैत्री व सहकार्याचे घनिष्ठ संबंध ठेवले आहेत. अशा प्रकारे भारताला आपला सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी भारतीय उपखंडात शांतता व स्थिरता आवश्यक असल्याने शेजारील प्रत्येक राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंधावर भर दिला आहे. एवढेच नव्हे तर सार्क परिषदेच्या माध्यमातून अनेक वादग्रस्त प्रश्न शांततापूर्ण मार्गाने सोडविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

**३. अनिवासी भारतीयांचे संरक्षण**

जगातील ३६ राष्ट्रांमध्ये ३२ कोटी लोकसंख्या अनिवासी भारतीय आहे. अनिवासी भारतीयाकडून प्रत्येक वर्षी १०० अब्ज डॉलर्सचा परकीय चलन भारताला मिळते. या अनिवासी भारतीयांचा भारतीय अर्थव्यवस्थेत व राष्ट्र विकासात खूप मोठे योगदान आहे. त्यामुळे अनिवासी भारतीयांचे संरक्षण करणे भारत सरकारच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख उद्दिष्टे आहे. भारत सरकारने अनिवासी भारतीय नागरिकांच्या हित व अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी सातत्याने संबंधित राष्ट्राचे सरकारकडे आणि गरज पडल्यास आंतरराष्ट्रीय

गटाकडून प्रश्न सोडविण्याची भूमिका नेहमी घेतली आहे. परदेशात फसवणूक झालेल्या स्त्रिया, अपहरण झालेले नागरिक, नोकरी- कामानिमित्ताने स्थायिक झालेल्या कामगारांची सुरक्षा, शिक्षण घेण्यासंबंधीच्या तक्रारी, नैसर्गिक संकटे व युद्धात सापडलेले नागरिक, व्हिसा, पासपोर्टसंबंधी तक्रार, वर्णद्वेष, भेदभाव करणे इत्यादी अनेक कारणांसाठी परराष्ट्र मंत्रालय मदत करत असते. अनिवासी भारतीयांना तेथील राष्ट्रांत संघटित करण्यासाठी सभा किंवा संमेलनाचे आयोजन करून त्यांच्याशी संवाद साधला जात आहे. देश-विदेशातील भारतीयांचा सन्मान करणे हे परराष्ट्र धोरणाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य बनले आहे. अशा प्रकारे अनिवासी भारतीयांचे संरक्षण व सन्मान हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट्य आहे.

**आंतरराष्ट्रीय उद्दिष्टे**

**१. आंतरराष्ट्रीय संघटनांना सहकार्य करणे**

१९९१ नंतर बदलत्या जागतिक विश्वरचनेत भारताने युनोच्या सुरक्षा समितीत कायम सदस्यत्वाची मागणी केली आहे. युनोच्या स्थापनेला ७५ वर्षांपेक्षा जास्त वर्षे झाली. आज युनोची सदस्य संख्या १९३ झाली आहेत. जगाच्या अर्थव्यवस्थेला प्रभावित करण्याची क्षमता अमेरिका, फ्रान्स, इग्लंड, रशिया, चीन या राष्ट्रांशिवाय इतर अनेक राष्ट्रांमध्ये आहे. त्यामुळे युनोसहीत सर्वच अंगाच्या रचनेत विशेषतः सुरक्षा समितीच्या रचेनत बदल झाला पाहिजे अशी भूमिका भारत, ब्राझील, जर्मनी, जपान, दक्षिण आफ्रिका ही राष्ट्रे घेत आहेत. भारताने मित्र राष्ट्रांच्या संख्येत वाढ करून युनोमध्ये सुरक्षा समितीत कायम सदस्यत्व मिळविण्यासाठी पोषक वातावरण तयार करण्याची दिशा स्पष्ट केली आहे. स्वातंत्र्यापासून आजपर्यंत भारताने आंतरराष्ट्रीय संघटनांना सहकार्य करण्याचे ध्येय बाळगले होते. ज्या-ज्यावेळी जागतिक पातळीवर गंभी प्रश्न निर्माण झाले त्यावेळी भारताने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. यांचे खास उदाहरण म्हणजे कोरिया प्रश्न, हंगेरीचा पेचप्रसंग, सुवेझ कालवा प्रश्न, इंडो-चायना, कांगो इत्यादी आंतरराष्ट्रीय वादांकित मुद्यांची शांततेच्या माध्यमातून सोडवणूक करण्यासाठी भारताने सातत्याने प्रयत्न केले आहेत. भारताचा काश्मीर प्रश्न व गोवा विलिनीकरणाचा प्रश्न युनोमार्फत सोडविण्याचा प्रयत्न केला. युनोची शांतता मोहीम, प्रत्येक प्रश्न युनोच्या व्यासपीठावरून सोडवला जावा अशी भारताची भूमिका होती. युनोच्या आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन करणे, दहशतवाद निर्मूलन, पर्यावरण संरक्षण, महिला सबलीकरण, आरोग्य, मानवी हक्क, शिक्षण, बाल कामगार, स्वच्छता अशा अनक क्षेत्रात भारताने संयुक्त राष्ट्र संघटनेला सहकार्य केले. आज २१ व्या शतकात खाऊजा धोरणामुळे अनेक प्रश्न

किंवा समस्या निर्माण झाल्या आहेत. यामध्ये दहशतवाद, वाढती गुन्हेगारी, गरिबी, दारिद्रय, उपासमारी, कुपोषण, अन्न-वस्त्र-निवारा, आरोग्य, इंधन, काळ्या पैशाचा प्रश्न, ऊर्जा, पाणी, नैसर्गिक संकटे, दुष्काळ, ई-नेटवर्क, अपंग, वृद्ध, संप्रदायवाद, आर्थिक विकास इत्यादी अनेक प्रश्न व समस्यांची सोडवणूक करण्यासाठी भारताची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली आहे. या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी भारताने संयुक्त राष्ट्र संघटना, आसियान, सार्क, बिमस्टेक, ब्रिक्स, जी-२०, जी-७, जागतिक बँक, जागतिक कामगार संघटना, ईस्ट आशिया, शांघाय सहकार्य संघटना, एशिया पॅसिफिक इकॉनॉमिक को-ऑपरेशन, क्वाड, युरोपियन आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक आरोग्य संघटना अशा विविध संघटनांमध्ये योग्य भूमिका मांडलेली आहे. एकंदरीत आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्माण झालेल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी भारताने आंतरराष्ट्रीय संघटनांना सहकार्य केलेले दिसून येते.

**२. जागतिक शांतता व सुरक्षितता निर्माण करणे**

आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा एक महत्त्वाचा पैलू असल्यामुळे भारत कोणत्याही लष्करी संघटनेत सामील झाला नाही. कारण लष्करी संघटनामुळे राष्ट्राराष्ट्रांत सत्ता संघर्ष व स्पर्धा वाढवून युद्ध होण्याची शक्यता असते. म्हणून आजपर्यंत जगात कोठेही युद्ध सुरू झाल्यास ते तात्काळ थांबविण्यासाठी भारताने प्रयत्न केलेले आहेत. मानवाच्या सर्वांगीण कल्याणासाठी तसेच अविकसित व विकसनशील राष्ट्रांच्या विकासासाठी पहिल्या व महायुद्धासारखे भविष्यात विनाशकारी युद्ध उद्भवू नयेत म्हणून भारताने नेहमी जागतिक शांततामय सहजीवनाचे महत्त्व विशद करून निःशस्त्रीकरणाचा पुरस्कार केला आहे. भारतावर चीनने अचानक आक्रमण केल्यामुळे पंचशील तत्वाचा तडा गेला तरी सुद्धा भारताने भारत-चीन सीमावाद शांततेच्या मार्गाने सोडविण्यासाठी प्रयत्न केलेला दिसून येतो. तसेच आंतरराष्ट्रीय विवाद, प्रश्न हे करार लवादामार्फत शांततेच्या व सामंजस्याच्या मार्गाने सोडविण्यासाठी भारताने महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे. याशिवाय जगात शांतता व सुरक्षिततेसाठी शस्त्रास्त्र स्पर्धा, अण्वस्त्र स्पर्धा, युद्ध, हुकूमशाही, शस्त्रनिर्मितीला विरोध करून अहिंसा, सहकार्य, सद्भावना, सहिष्णूता, शांततामय सहजीवन, वसुधैव कुटुम्बकम, करार, तह अशा अनेक मार्गाने प्रयत्न केले आहेत. भारताने जागतिक शांतता व सुरक्षितता कायम राखण्यासाठी अलिप्ततावाद, पंचशील, अनाक्रमण, निःशस्त्रीकरण, ताश्कंद करार, कोलंबो प्रस्ताव, शिमला करार, आग्रा

करार, गुजराल सिद्धांत. इत्यादीच्या माध्यमातून जागतिक शांतता व सहकार्यासाठी भारताच्या परराष्ट्र धोरणाने प्रयत्न केलेले दिसून येतात.

**सारांश**

भारतीय परराष्ट्र धोरणाचे प्राथमिक, मध्यवर्ती आणि आंतरराष्ट्रीय उद्दिष्ट्ये यांचा सविस्तरपणे अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की, भारताचे परराष्ट्र धोरण हे लवचीक स्वरूपाचे असून त्यांनी जागतिक शांतता, सुरक्षितता, मानवतावाद, मानवी हक्कांचे संरक्षण, लोकशाही विस्तारवादाला महत्त्व दिल्याचे दिसून येते. तसेच संयुक्त राष्ट्र संघटनेतील सुरक्षा परिषदेचा विस्तार करून सदस्य संख्या वाढविण्यासाठी महत्वपूर्ण केलेले आहेत. यातून सुरक्षा परिषदेतील अमेरिका, ब्रिटिन, फ्रांस, चीन आणि रशिया यांच्या एकाधिकार शाहीला शह देण्याचा प्रत्न केलेला दिसून येतो.

**संदर्भग्रंथ**

१. दि.का.गर्दे, प्राचीन भारतीय राजकीय विचार, कॉंन्टिनेंटल, प्रकाशन, पुणे, पृ. १९७९

२. रा.ज. लोटे, भारताची विदेशनीती, पिंपळापुरे ॲन्ड पब्लिशर्स, नागपूर, १९९५

३. सिंग गेहलोत, भारतीय परराष्ट्र धोरण, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली, 2006

४. Gupta K.R., Foreign Policy of India (Vol.No.1), Atlantic Publication, New Delhi, 2009

५. Mishra K.P., Foreign Policy of India, Vikas Publication, New Delhi, 1977

६. दत्त, व्ही.पी., इंडियाझ फॉरेन पॉलिसी इन अ चेंजींग वर्ल्ड, विकास पब्लिशिंग हाऊस नई दिल्ली, प्रथामवृत्ती, १९९९

७. pandit Hehru, India’s Foreign policy, Publications Divisions, 1962, New Delhi

८. चंद्रा बिपीन, इंडिया सिन्स इंडिपेंडन्स, पेंग्विन बुक्स, २००७, नवी दिल्ली

९. जे.एन. दिक्षित, इंडियन फॉरेन पॉलिसी, पीक्स बुक्स, २००३, नवी दिल्ली